THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 27TH APRIL 1893.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### सिव्हिल प्रोसीजर कोड आणि सन १८७७ चा हिंदुस्तानचा मुदतीविषयींचा आक्ट सुधारण्याबाबत आक्टाचा मसुदा.

सिव्हिल प्रोसीजर कोड आणि सन १८७७ चा हिंदुस्तानचा मुदतीविषयींचा आक्ट सुधारणें ज्या अर्थी इष्ट आहे, त्या अर्थी, खालीं लिहिल्याप्रमाणे कायदा ठरविण्यांत येत आहे:—

लहान सरनामा व सुरुवात.

१. (१) ह्या कायद्यास सन १८९३ चा सिव्हिल प्रोसीजर कोड सुधारण्याबाबत आक्ट असें ह्मणावें; आणि

(२) तो एकदम अमलांत येईल.

सदर्हू कोडाच्या ३१० व्या कलमानंतर एक नवीन कलम दाखल करणें.

२. सिव्हिल प्रोसीजर कोडाच्या ३१० व्या कलमानंतर खालीं दिलेलें कलम दाखल करावें: तें कलम येणेंप्रमाणें:—

विक्री रद्द करण्याबद्दल फैसल्यांतील रिणकोनें अर्जी करावी.

"३१० अ. ज्या कोणत्याही मनुष्याच्या स्थावर मिळकतीची ह्या बाबीअन्वयें विक्री झाली असेल त्याला, हुकुमनामेवाल्यास देण्याकरितां हुकुमनाम्यावरून वसूल होण्यास पात्र असलेली दाव्याच्या खर्चासहित रकम आणि खरेदीदारास देण्याकरितां खरेदीच्या पैशाची शेंकडा पांच इतकी रकम कोर्टांत अमानत ठेवून, ती विक्री रद्द व्हावी असा अर्ज करण्याचा अखत्यार आहे.

मात्र, जर कोणताही मनुष्य आपल्या स्थावर मिळकतीची विक्री रद्द करण्याबद्दल लगत पुढच्या कलमाअन्वयें अर्ज करील, तर त्याला ह्या कलमाअन्वयें अर्ज करतां येणार नाहीं."

सदर्हू कोडाच्या ३१२ व्या कलमाची सुधारणा.

३. सिव्हिल प्रोसीजर कोडाच्या ३१२ व्या कलमांत "सदरील शेवटच्या कलमांत" ह्या शब्दांच्या ऐवजीं "सदरील शेवटच्या दोन कलमांत," हे शब्द दाखल करावे, आणि त्याच कलमांतील "हरकत" हा शब्द आणि "सदर्हू प्रकारच्या बेशिस्तपणाच्या कारणावरून" हे शब्द रद्द करावे.

सन १८७७ चा आक्ट १५ या याच्या दुसऱ्या परिशिष्टांत जास्त मजकूर दाखल करणें.

४. सन १८७७ चा हिंदुस्तानचा मुदतीविषयींचा आक्ट ह्याच्या दुसऱ्या परिशिष्टांतलि १६९ नंबराच्या बाबीनंतर खालीं दिलेला मजकूर दाखल करावा: तो मजकूर येणेंप्रमाणें :—

| अर्जीचा प्रकार. | मुदत. | मुदत ज्या वेळेपासून चालू होते ती वेळ. |
|---|---|---|
| "१६९ अ. हुकुमनाम्याच्या बजावणींत केलेली विक्री रद्द करण्यासाठीं दिवाणी इन्साफाचें काम चालविण्याचे रीतीविषयींचे कायद्याचे ३१० अ कलमाअन्वयें करावयाची." | "तीस दिवस." | "विक्रीची तारीख." |

## हेतु व कारणें ह्यांचें निरूपण.

हुकुमनाम्याअन्वयें विकावयास काढिलेल्या स्थावर मिळकतीची योग्य किंमत बहुतकरून येत नाहीं ही गोष्ट लोकांस चांगली माहीत आहे. ही गोष्ट लक्षांत आणून, सन १८८९ चा बंगालचा टेनन्सी आक्ट घडविणारांनीं, कुळांचे जमिनीवरील हक्क अगर कुळांच्या धारण केलेल्या जमिनी थकलेल्या भाड्याबद्दलच्या हुकुमनाम्यांची बजावणी होऊन विकल्या जातांना त्यांच्या संबंधानें असा तोटा होऊं नये ह्या उद्देशानें त्या आक्टांत एक ठराव मुद्दाम दाखल केला आहे. त्या ठरावांत असें आहे कीं, हुकुमनाम्यांतील रिणकोनें हुकुमनामेवाल्यास देण्याकरितां हुकुमनाम्यावरून वसूल होण्यास पात्र असलेली दाव्याच्या खर्चासहित रकम आणि खरेदीदारास देण्याकरितां खरेदीच्या पैशाची शेंकडा पांच इतकी रकम विक्रीच्या तारिखेनंतर तीस दिवसांच्या आंत कोर्टामध्यें अमानत ठेविली ह्मणजे त्याला ती विक्री त्या कोर्टाकडून रद्द करविण्याचा अख़त्यार प्राप्त होतो. आह्मांस असें वाटतें कीं ह्या कलमाचा अमल चांगला झाला आहे, आणि त्याच्या योगानें कुळांस, आपले जमिनीवरचे हक्क किंवा आपण धारण केलेल्या जमिनी त्यांबद्दलची येणारी किंमत त्यांच्या बाजारकिमतीइतकी जेव्हां नसते तेव्हां बचावतां आल्या आहेत. आतां, साधारण दिवाणी कोर्टांनीं केलेल्या हुकुमनाम्यांवरहुकुम स्थावर मिळकत विकण्याच्या संबंधाचे सिव्हिल प्रोसीजर कोडमध्यें जे ठराव आहेत त्यांमध्यें सदहू प्रकारचा एक ठराव दाखल करून इतर हुकुमनाम्यांतील रिणकोंस देखील सदरील सवड द्यावी असा विचार आहे. आणि त्या विचारास अनुसरून एक ठराव ह्या मसुद्याच्या २ ऱ्या कलमांत दाखल केला आहे. सिव्हिल प्रोसीजर कोडाच्या ३१२ व्या कलमांत आणि सन १८७७ चा हिंदुस्तानचा मुदतीविषयींचा आक्ट ह्याच्या दुसऱ्या परिशिष्टांत जे फेरफार करावयाचे आहेत, ते, मसुद्याचीं कलमें ३ व ४ ह्यांत निर्दिष्ट केले आहेत. ते सदरील ठरावाच्या संबंधाचे आहेत ह्मणून त्यांबद्दल खुलासा करण्याची जरूरी नाहीं.

(सही) रासबिहारी घोस.

तारीख ६ मार्च सन १८९३.

(True Translation.)

Y. M. KELKAR,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.